| | |
|---|---|
| **MHAU080037622024** | दाखल तारीख : २४.०६.२०२४<br>नोंदणी तारीख : २४.०६.२०२४<br>निकाल तारीख : १२.०८.२०२६<br>कालावधी : ०२ वर्ष, ०१ म., २० दि. |

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, सिल्लोड यांचे न्यायालय, (न्यायालय क्र.०३).**

(पिठासीन अधिकारी श्री. ए.एच. तट्टु)

निकाल तारीख : १२ ऑगस्ट, २०२६

**नियमीत फौजदारी खटला क्र. १७२/२०२४** **निशाणी क्र.२५**

**प्रथम खबर अहवालाचे विवरण –**

गु.र.क्र.– १६/२०२४, दि.२०.०१.२०२४, भा.दं.वि. कलम १४३, १४७, ३२४, ३२३, ४२७, ५०४, ५०६ प्रमाणे, पोलीस ठाणे – अजिंठा, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद.

| | |
|---|---|
| **अभियोगपक्ष** | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत पोलीस ठाणे अंमलदार, पोलीस स्टेशन अजिंठा, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद. |
| **अभियोगपक्षातर्फे विधीज्ञ** | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. जी. बी. कदम. |
| आरोपी | **१. ज्ञानेश्वर लालसिंग जाधव,**<br>वय – ४७ वर्षे, धंदा – शेती.<br>**२. रुद्रासिंग ईश्वरसिंग जाधव,**<br>वय – १९ वर्षे, धंदा – शेती.<br>**३. सांडुसिंग लालसिंग जाधव (मयत),**<br>वय – ५६ वर्षे, धंदा – घरकाम.<br>**४. विवेकसिंग सांडुसिंग जाधव,**<br>वय – २४ वर्षे, धंदा – शेती.<br>**५. माया सांडुसिंग जाधव,**<br>वय – ४१ वर्षे, धंदा – घरकाम.<br>**६. पदमाबाई ज्ञानेश्वर जाधव,** |

| | |
|---|---|
| | वय – ३८ वर्षे, धंदा – शेती.<br>**सर्व आरोपी रा. धोत्रा, ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद.** |
| **आरोपींतर्फे विधीज्ञ** | श्री.ए.एस.शर्मा. |

**भाग–ब**

(फौजदारी प्रक्रिया संहिता प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | |
|---|---|
| घटनेची तारीख | २०.०१.२०२४ |
| प्रथम खबर अहवालाची तारीख | २०.०१.२०२४ |
| अंतिम दोषारोप पत्र दाखल तारीख | २४.०६.२०२४ |
| दोषारोपाचा आशय निश्चीत केल्याची तारीख | २५.०७.२०२५ |
| पुरावा सुरू केल्याची तारीख | ११.०८.२०२६ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याची तारीख | युक्तीवादानंतर त्वरीत घोषीत करण्यात आला. |
| न्यायनिर्णय तारीख | १२.०८.२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक, जर असेल तर | लागू नाही |

## आरोपींचे विवरण

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप निश्चीत केल्याचे कलम | शिक्षा किंवा निर्दोष सुटका | शिक्षा | फौ.प्र. सं कलम ४२८ अन्वये सामायोजीत (Set off) करण्यातबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ज्ञानेश्वर लालसिंग जाधव | ०२.०६.२०२२ | -- | भा.दं.वि. कलम १४३, १४७, ३२४, ३२३, ४२७, ५०४, | निर्दोष सुटका | लागू नाही | लागू नाही |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ५०६ प्रमाणे. | | | |
| २ | रुद्रासिंग ईश्वरसिंग जाधव | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | निर्दोष सुटका | लागू नाही | लागू नाही |
| ३ | सांडुसिंग लालसिंग जाधव (मयत) | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | निर्दोष सुटका | लागू नाही | लागू नाही |
| ४ | विवेकसिंग सांडुसिंग जाधव | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | निर्दोष सुटका | लागू नाही | लागू नाही |
| ५ | माया सांडुसिंग जाधव | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | निर्दोष सुटका | लागू नाही | लागू नाही |
| ६ | पदमाबाई ज्ञानेश्वर जाधव | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | निर्दोष सुटका | लागू नाही | लागू नाही |

## भाग–क

(फौजदारी प्रक्रिया संहिता प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**अभियोगपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार :**

**अभियोगपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार –**

| सा.क्र. | साक्षीदारांचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | शुभम हरीसिंग जाधव | फिर्यादी | १९ |

**आरोपीच्या साक्षीदारांची यादी**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**अभियोगपक्षाने दाखल केलेल्या दस्तांच्या निशाणी क्रमांकाची यादी**

12/8/25

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | २० | फिर्यादवरील सहीपुरती |
| २. | २१ | प्रथम खबरी अहवालावरील सहीपुरती |

### आरोपीस मान्य असलेले दस्ताऐवज

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

### आरोपीने दाखल केलेल्या दस्तांच्या निशाणी क्रमांकाची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

### न्यायालयाने स्वतःहुन दिलेल्या दस्तांच्या निशाणी क्रमांकाची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

### आर्टिकल / चीजवस्तु

| अ.क्र. | आर्टिकल क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय

### (घोषित दिनांक १२ ऑगस्ट, २०२६)

आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता १८६० कायद्याचे कलम १४३, १४७, ३२४, ३२३, ४२७, ५०४, ५०६ प्रमाणे संपरिक्षा चालविण्यात आलेली आहे. *(यापुढे संक्षिप्ततेकरीता 'भा.दं.वि.' असा उल्लेख करण्यात येईल)*

12/8/25

**अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात खालील प्रमाणे आहे –**

२. दि.२१.०१.२०२४ रोजी सकाळी ०९.०० वाजेच्या सुमारास मौजे धोत्रा ता. सिल्लोड येथे फिर्यादी हा लोकांना अंतोदय अन्न सुरक्षाा योजनेअंतर्गत यादीनुसार धन्य वाटपाचे काम करत असतांना आरोपी क्र. ६ ही व ग्रामपंचायत शिपाई नंदकुमार जाधव हे तेथे आले व फिर्यादीला म्हणाले की, तुझ्याकडे कोणकोणतया योजनेचे धान्य येते व तू कोणाकोणाला धान्य वाटप करतो असे विचारले. त्यावरुन फिर्यादीने चालू असलेल्या योजनेबाबत सांगितले त्यावरुन आरोपीने फिर्यादीला शेतकरी ए.पी.एल योजना बंद असली तरी सदरचे धान्य त्या योजनेत वाटप करा असे सांगितले, त्यावरुन फिर्यादीने आरोपीला सांगितले की, त्याच्याकडे प्राप्त यादीनुसार राशन धारकाचे आधार कार्ड व थंब घेऊन चालू असलेल्या योजनेनुसार धान्य वाटप केले जाते. त्यानंतर आरोपी तेथून निघून गेली. त्यानंतर दहा मिनिटांनी सर्व आरोपी तेथे आले व आरोपी क्र. २ ला राशन का देत नाही या कारणावरुन फिर्यादीच्या धान्य दुकानातील यादी व परवाना तसेच मशीन फेकून दिली. त्यानंतर आरोपी क्र.२ ने फिर्यादीच्या डोक्यात मारुन त्याचे डोके फोडून त्याला गंभीर दुखापत केली. तसेच, इतर आरोपींनी फिर्यादीला लाथाबुक्यांनी मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे फिर्यादीने आरोपींच्या विरोधात अजिंठा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

३. सदरच्या फिर्यादवरुन गु.र.क्र.१६/२०२४ अन्वये भा.द.वि. कलम १४३, १४७, ३२४, ३२३, ४२७, ५०४, ५०६ प्रमाणे नोंद करण्यात आला. तपासी अधिकारी यांनी तपासादरम्यान साक्षीदारांचे जबाब नोंदविले व शेवटी आरोपींविरुध्द पुरावा मिळून आल्यामुळे न्यायालयामध्ये दोषारोप पत्र दाखल करण्यात आले.

४. आरोपी न्यायालयात हजर झाले. या न्यायालयाने आरोपींवरती

(नि.क्र.१९) प्रमाणे दोषारोप ठेवला असता त्यांनी निवेदना नुसार मान्य व कबुल केला नाही आणि संपरिक्षेची मागणी केली. सदर प्रकरणातील फिर्यादी व आरोपी यांच्यामधील गैरसमज दूर झाले असल्यामुळे त्यांनी त्यांच्यामधील भविष्यातील संबध सलोख्याचे राहण्यासाठी सदर प्रकरणात (नि.क्र.१७) प्रमाणे तडजोड करण्याची परवानगी मागितली. परंतु आरोपींच्या विरोधातील आरोप हे तडजोड पात्र नसल्यामुळे त्यांचा अर्ज नामंजुर करण्यात आला. त्यांनी त्यांच्या मधील न्यायालयाबाहेर झालेल्या तडजोडीबाबत (नि.क्र.१८) प्रमाणे सुलाहनामा पटलावरती दाखल केला.

५. फिर्यादीने त्याच्या पुराव्यात प्रस्तुत प्रकरणात इतर साक्षीदार तपासावयाचे नसल्याबाबत कथन केल्यामुळे व त्याबबतची पुरसीस (नि.क्र.२३) वरती दाखल केल्याने आणि अभियोगी वकिलांच्या तोंडी विनंतीवरुन, तसेच खटल्यामध्ये तडजोड झाल्यामुळे अन्य साक्षीदार तपासून देखील कोणताही हेतू साध्य होत नसल्याचे न्यायालयाचे मत झाल्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. अभियोग पक्षाच्या पुराव्याअंती आरोपींविरूद्ध त्यांना गुन्ह्यात गुंतवणारा पुरावा आलेला नसल्यामुळे त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३(१)(ब) प्रमाणे जबाब नोंदविण्यात आले नाहीत.

६. अभियोगपक्षाच्या कथनावरुन मी खालील मुद्दे विचारात घेतले आहे. सदर मुद्दे, त्यावरील निष्कर्ष व कारणे खालीलप्रमाणे आहेत–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे का की, आरोपी क्र. १ ते ६ यांनी दि. २०.०१.२०२४ रोजी सकाळी १०.४० च्या दरम्यान मौजे धोत्रा, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद येथे फिर्यादीचे धान्य दुकानासमोर फिर्यादीस | |

Ajay
12/8/25

| | | |
|---|---|---|
| | मारहाण करुन गुन्हा करण्याच्या समान हेतूने गैरकायद्याची मंडळी जमवून भा.द.वि. कलम १४३ नुसार गुन्हा केला ? | नकारार्थी. |
| ०२. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपी क्र.१ ते ६ यांनी समान हेतू साध्य करण्याकरिता गैरकायद्याची मंडळी जमवून दंगल घडविली व त्यायोगे भा.द.वि. कलम १४७ नुसार गुन्हा केला ? | नकारार्थी. |
| ०३. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी समान हेतू साध्य करण्याकरिता गैरकायद्याची मंडळी जमवून आरोपी क्र. १ ते ६ ने स्वेच्छेने फिर्यादीस दगडोन डोक्यात मारुन गंभीर दुखापत केली आणि त्यायोगे भा.द.वि. कलम ३२४ नुसार गुन्हा केला ? | नकारार्थी. |
| ०४. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपी क्र.१ ते ६ यांनी समान हेतू साध्य करण्याकरिता गैरकायद्याची मंडळी जमवून सर्व आरोपींनी फिर्यादीस लाथाबुक्यांनी मारहाण करुन दुखापत केली व त्यायोगे भा.द.वि. कलम ३२३ नुसार गुन्हा केला ? | नकारार्थी. |
| ०५. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपी क्र.१ ते ६ यांनी समान हेतू साध्य करण्याकरिता गैरकायद्याची मंडळी जमवून फिर्यादीच्या धान्य दुकानातील मशीन, यादी व परवाना याचे जाणीवपूर्वक नुकसान केले आणि त्यायोगे भा.द.वि. कलम ४२७ नुसार गुन्हा केला ? | नकारार्थी. |

1/8/24

| | | |
|---|---|---|
| ०६ | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपी क्र.१ ते ६ यांनी समान हेतू साध्य करण्याकरिता गैरकायद्याची मंडळी जमवून फिर्यादीला हेतूपुरस्पर अपमानित करुन त्याचेकडून शांततेचा भंग होईल अशी चिथावणी दिली आणि त्यायोगे भा.द.वि. कलम ५०४ नुसार गुन्हा केला ? | नकारार्थी. |
| ०७ | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपी क्र.१ ते ६ यांनी समान हेतू साध्य करण्याकरिता गैरकायद्याची मंडळी जमवूनफिर्यादीस फौजदारी पात्र धाकदपडशा दाखवुन जीवे मारण्याची धमकी दिली आणि त्यायोगे भा.द.वि. कलम ५०६ नुसार गुन्हा केला ? | नकारार्थी. |
| ०८ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमीमांसा

**मुद्दे क्र. १ ते ७ करिता एकत्रीतपणे :**

**७.** मुद्दा क्र.१ ते ८ हे एकमेकांशी निगडीत असल्याकारणाने घटनेची व पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्रीतपणे विचारात घेतले आहेत. आरोपींच्या विरोधात गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने घटनेच्या दिवशी आरोपींनी एकमेकांशी संगणमत करुन भारतीय दंड संहितेच्या कलम १४३, १४७, ३२४, ३२३, ४२७, ५०४, ५०६ प्रमाणे अपराध केला, हे संशयाच्या पलीकडे सिध्द करणे जरूरीचे आहे.

**८.** फिर्यादी सा.क्र.१ हा घटनेतील मुख्य व जखमी साक्षीदार आहे. सदरील साक्षीदाराने त्याच्या साक्षी पुराव्यात कथन केले आहे की, आरोपींची व त्याची किरकोळ

12/8/26

वादावादी झाली होती. त्यानंतर त्याने आरोपींच्या विरोधात फिर्याद दिल्याचे कथन केले आहे. सदरील साक्षीदार अभियोग पक्षाला त्यांच्यामध्ये झालेल्या तडजोडीमुळे मदत करीत नसल्याने सुविद्य अभियोगी वकीलांनी साक्षीदाराला उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, साक्षीदाराने अभियोग पक्षाची कथने स्पष्टपणे नाकारलेली आहेत.

९. सदरील साक्षीदारांनी अभियोग पक्षाच्या सर्व प्रश्नांना नकारार्थी उत्तरे देवून, सदर दिवशी आरोपींनी संगणमत करुन आरोपीं यांनी फिर्यादीला शिवीगाळ केली व जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या या सर्व बाबी त्याने स्पष्टपणे नाकारलेल्या आहेत. अभियोग पक्षास त्याच्या उलट तपासामधून सहकार्य होईल अशी कोणतीही बाब पटलावरती आलेली नाही.

१०. फिर्यादीने नि.क्र.१८ वरील सुलाहनाम्यात कथन केले आहे की, त्याची व आरोपींची सदर प्रकरणामध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे व त्याला सदर प्रकरण पुढे चालवायचे नसल्याचे देखील त्याने मान्य केले आहे. फिर्यादी साक्षीदार हा घटनेतील जखमी व साक्षीदार असून त्यांच्या साक्षीचे अवलोकन केले असता त्यांनी घडलेली घटना त्यांच्यामध्ये झालेल्या तडजोडीमुळे स्पष्टपणे नाकारली असल्यामुळे अभियोगपक्ष आरोपींविरोधात दोषारोप निसंशय:पणे सिध्द करू शकलेला नाही.

११. फिर्यादीने नि.क्र.२३ वरती पुरसीस देऊन त्यांच्या पुराव्यात अन्य कोणतेही साक्षीदार तपासून पूढे पुरावा द्यावयाचा नसल्याचे कथन केल्यामुळे, पटलावरील पुराव्याचा आणि अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्याबाबतच्या विनंतीचा विचार करता, तसेच तपास अधिकारी व इतर साक्षीदारांची साक्ष नोंदविलेली नाही. त्यामुळे पटलावरील पुराव्याचे अवलोकन करता आरोपींवरील आरोप हे संशया पलीकडे सिद्ध न झाल्यामुळे ते

12/8/25

निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. म्हणून मी मुद्दा क्र.१ ते ८ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.९ साठी खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र. १. ज्ञानेश्वर लालसिंग जाधव, २. रुद्रासिंग ईश्वरसिंग जाधव, ३. सांडुसिंग लालसिंग जाधव मयत, ४. विवेकसिंग सांडुसिंग जाधव, ५. माया सांडुसिंग जाधव, ६. पदमाबाई ज्ञानेश्वर जाधव, यांना भारतीय दंड संहिता, १८६० च्या कायद्यातील कलम १४३, १४७, ३२४, ३२३, ४२७, ५०४, ५०६ अन्वये असलेल्या अपराधाखालील गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपी यांचे वैयक्तिक जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत.

३. आरोपी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ प्रमाणे प्रस्तुत खटल्याच्या न्यायनिर्णयास आव्हाण देण्याच्या अनुषंगाने आधीन राहून प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/– प्रमाणे वैयक्तीक जातमुचलका व त्या रकमेइतका जामीन द्यावा.

12/8/25

(ए. एच. तट्टु)
न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.०३), सिल्लोड.

दिनांक : १२.०८.२०२६.